
नव्या वसंताचे आश्वासन

नरसंहार आणि नवनिर्मिती

लेखक - गर्डा विसमन क्लेन

चित्रे - व्हिंसेंट टारटारो

मराठी - वंदना पलसाने



नव्या वसंताचे आश्वासन

नरसंहार आणि नवनिर्मिती

लेखक - गर्डा विसमन क्लेन

चित्रे - व्हिंसेंट टारटारो


मराठी - वंदना पलसाने

हे पुस्तक एलायसा, ज्युली, एन्ड्रू आणि मेलिसा, तसेच नव्या वसंताच्या सर्व वारसदारांना समर्पित आहे ...

जी. डब्ल्यू. के.



बराच काळ लोटला असला
तरी अनेक लोकांच्या स्मरणात असलेली
एक मोठी शोकांतिका होती, तो नरसंहार!
नरसंहार म्हणजे आगीमुळे होणारा
मोठ्या प्रमाणावरील विनाश आणि जीवितहानी.



एक क्रूर माणूस - हिटलर
आणि त्याचे अनुयायी, नाझी ---
सत्तेत आले.
त्यांनी उलटे स्वस्तिक आपले चिन्ह म्हणून निवडले;
आणि ते देशामागून देश काबीज करत गेले.
नाझींना जगातील सर्व मुक्त लोकांना आपले गुलाम बनवायचे होते.




सगळीकडचे भले लोक नाझींच्या विरुद्ध उभे ठाकले.
ते सहा वर्षं लढले.
कधी वाटे नाझीच जिंकतात की काय..




शेवटी एकदाचे युद्ध संपले आणि नाझी हरले.
युरोपातील देश मुक्त झाले.
दहशत आणि गुलामी पासून स्वतंत्र झाले.



पण नाझींनी त्यांच्या क्रौर्याच्या खुणा मागे ठेवल्या होत्या.
अनेक शहरे नष्ट झाली होती;
अनेकांनी आपले स्वकीय गमावले होते.




सर्वाधिक सहन करावे
लागले ते ज्यूंना!
नाझींनी ज्यू लोकांच्या
नोकऱ्या काढून घेतल्या
आणि ज्यू मुलांना शाळेत
जाण्यापासून रोखले.





नाझींनी ज्यू लोकांना, ते वेगळे ओळखू यावेत म्हणून,
बळजबरीने पिवळे बिल्ले घालायला लावले.

नाझींनी सर्व ज्यूंना मारून टाकायचे ठरवले -
लहान-मोठे सर्वांना एकत्र.
ज्यूंची प्रत्येक आठवण सुद्धा
नष्ट करायची होती त्यांना.
त्यांनी ज्यूंची पुस्तके जाळली.
पुस्तकं म्हणजे आठवणीचा ठेवा,
पण नाझींना तर जगाने ज्यूंना विसरून जावे, असेच वाटत होते.



त्यांनी ज्यूंना बंद भिंतींच्या आत राहायची सक्ती केली,
त्यांच्या जुन्या मित्रांपासून आणि शेजाऱ्यांपासून लांब,
आणि दरवाजे, फाटक बंद केले,
ज्यामुळे ज्यू लोकांना आत-बाहेर जाता येईनासे झाले.





अनेक ज्यू माणसे शहर आणि खेड्यांमध्ये मारली गेली.
पण एवढे जणू पुरेसे नव्हते,
नाझींनी ज्यूंची रवानगी छळ-छावण्यांमध्ये केली.
या छळ-छावण्यांभोवती काटेरी तारेचे कुंपण असे.
त्यांच्या आत नाझी ज्यूंची हत्या करत.
या प्रकारे नाझींनी केलेल्या ज्यूंच्या कत्तलीला नरसंहार (हॉलोकॉस्ट) म्हणतात.
हा संहार मानवजातीसाठी तितकाच भयंकर होता, जितका निसर्गासाठी
जंगलात पेटणारा वणवा असतो.

कल्पना करा, हे जग एक जंगल आहे,
खूप झाडे-झुडपे आणि फुले असलेले,
अनेक जीव-जंतू, विविध प्राणी रहात असलेले सुंदर जंगल,
अगदी जसे आपले जग आहे, तसेच.
वेगवेगळे ऋतू जिथे जीवनक्रम ठरवतात,
जीवन सुव्यवस्थित ठेवतात.



वसंत ऋतू मध्ये, जीवन फुलते. झाडांना नवी पालवी फुटते,
घरट्या-घरट्यातून अंडी फोडून पक्षी बाहेर येतात,
अस्वलांचे छावे डोळे फाडून चकित नजरांनी जगाकडे पाहतात,
वेगाने वाहत्या झऱ्यांच्या काठांवर असंख्य निळी रानफुले उगवतात,
आणि नव्या वसंत ऋतूत आपला सुगंध मिसळवून टाकतात.







मग उन्हाळा येतो.
फांद्यांवरील पाना-पानाचा रंग गडद होत जातो.
झाडे घनदाट आणि हिरवी होतात.
छोट्या पक्षांना आता उडता येते;
हरणांच्या छाव्यांचे पाय आता डुगडुगत नाहीत,
मजबूत पायांनी ते जंगलात वाऱ्यासारखे पळतात
झऱ्यांचे गोड पाणी शोधत.



उन्हाळ्यानंतर येतो शरद ऋतू.
आता जंगल अनेक प्रकारच्या छोट्या छोट्या फळांनी,
आळंब्यांनी, मेव्यांनी बहरते.
खारी लगबग करत अखरोट आणि इतर मेवे गोळा करून
झाडांच्या पोकळ कपारींमध्ये लपवून ठेवतात,
म्हणजे मग त्यांना हिवाळ्यात खाण्यासाठी अन्न राहते.
पक्ष्यांची घरटी मात्र आता रिकामी होतात.
कारण, छोटे पक्षी उडून गेलेले असतात ना!



शेवटी येतो हिवाळा, आणि बर्फ पडू लागतो.
हळू हळू, अंधारलेल्या आभाळातून,
पांढऱ्या शुभ्र नाजूक लेसी सारखे तारेच जसे,
असे लाखो-करोडो बर्फाचे कण
नि:शब्दपणे खाली जमिनीवर येऊन पडतात.
जणू झोपलेल्या जंगलावर एखादे जाड, मऊ पांघरूण
अलगद पांघरावे कुणी!




अर्थात, हिवाळा म्हणजे काही मृत्यू नव्हे.
ती एक दीर्घ, गहिरी आणि प्रफुल्लित करणारी झोप असते,
जणू निसर्ग म्हणत असतो: “शश्शश्श! झोपा आता,
नव्याने येणाऱ्या वसंत ऋतूसाठी ताकद साठवून ठेवा!”
जशी तुम्हाला रात्री झोप लागते ना,
दुसऱ्या दिवशी ताजेतवाने होऊन उठण्यासाठी;
अगदी तशीच, हिवाळ्याची गरज असते
नव्या वसंत ऋतूला जन्म घेण्यासाठी!



फुलं काही खरंच मेली नव्हती -
फक्त एकाच उन्हाळ्यातील फुले सुकली होती,
एकाच पिढीची फुले संपली होती.
आपल्या मुळांपासून, बियांमधून
तशीच फुले उमलतील, जशी नष्ट झाली होती,
जेव्हा वसंत ऋतू पुन्हा येईल.
झाडांच्या फांद्यांवर असलेल्या घरट्यांमधून
पक्ष्यांची नवी पीढी जन्म घेईल
आणि वेगवेगळ्या आवाजात चिवचिवाट करत गाणे म्हणेल.
हिवाळ्यात छान सुरक्षित ठेवली गेलेली फुलपाखरांची अंडी,
उन्हे वाढली आणि उष्मा परतून आला की उबतील
आणि नव्या फुलपाखरांनी रान फुलून जाईल.



हेच जीवनाचे चक्र आहे,
कधीही न थांबणारी, सतत चालू राहणारी
जीवन शृंखला आहे!







पण समजा जर कुणा दुष्ट हातांनी
एखाद्या वसंत ऋतूमध्ये किंवा उन्हाळ्यात
या जंगलाला आग लावायचे ठरवले -
ऋतूंच्या संपूर्ण जीवनचक्राला नष्टच करून टाकायचे ठरवले, तर?



छोट्या छोट्या खारी आताच तर कुठे डोळे
उघडून जगाकडे पाहू लागल्या,
त्यांच्या घरट्यातली अंडी अजून सगळी उबली पण नाहीत,
फुले सुद्धा उमलू पाहताहेत हळू-हळू
काजव्यांना चमकायची संधीही मिळायच्या आधी,
आणि ते भले थोरले ओकचे झाड -
किती उंच, मजबूत आणि किती तरी वर्ष जुने.



हे सगळे; लहान आणि मोठे,
सुंदर आणि सामान्य,
शहाणे आणि साधे-सुधे,
सगळे जळून जातील, नष्ट होतील,
ऋतूचक्राच्या, जीवनचक्राच्या सामान्य नियमाच्या विरुद्ध.



कुठेही मुळेच उरणार नाहीत,
ज्यातून नवीन काही उगवू शकेल,
आणि अंडीच नसतील तर कुठून येतील
नवी छोटी पिल्ले -
केवढे मोठे ते जंगल -
त्यातील जीवन कायमचे हरवून जाईल.

नरसंहार घडला, तेव्हा हेच झाले.
थोडीच माणसे वाचली.



फक्त थोडीच
ज्यांना सरव्हायवर (जिवंत
उरलेले) म्हणले गेले.






जसं सहसा जंगलात आग लागली की होतं,
काही पक्ष्यांचे पंख गरम आगीच्या
ज्वाळांमध्ये जळतात,
पण इतके नाही की ते स्वातंत्र्याच्या दिशेने
उडूच शकणार नाहीत.



हे पण शक्य आहे की
एखादे म्हातारे झाड करपून जाते,
पण तरी उभे राहते ते मूक जंगलात.
ते जिवंत राहते कारण, कदाचित
त्याची मुळे इतकी खोल गेलेली असतात की
आगीने करपलेल्या जमिनीच्या
खूप खालचे पाणीही शोषून घेऊ शकतील.



बहुधा, ते झाड अजून ही जिवंत
राहू शकेल,
त्याच्या एखाद्याच का होईना
फांदीवर नवी पालवी फुटून यायला.





काही हरणे अगदी वेळेत पळून गेल्यामुळे
आगीतून वाचली असतील.
काही ससुले जमिनीत आत खोल पोकळीत
असलेल्या त्यांच्या ढोलींमध्ये असल्यामुळे वाचले असतील -
आपल्या मोठ्याल्या कुटुंबातील
शेवटचे उरलेले काही थोडे.





अशाच प्रकारे नरसंहारातून वाचली काही माणसे.
त्यांना आता एक महत्वाचे काम करायचे आहे,
एक नवे जीवन उभे करायचे आहे ....



दुष्ट प्रवृत्तींनी नष्ट करण्यापूर्वी
हे जग कसे होते,
हे आठवायचे आहे ...

आपल्या आठवणी पुन्हा पुन्हा सांगायच्या आहेत,
सांगायच्या आहेत आपल्या कहाण्या
आपल्या मुलांना आणि नातवंडांना,
त्या सर्वांना, जे जे ऐकायला तयार आहेत.






ऐका, नीट ऐका या कहाण्या
त्यांनी जे जे काही पाहिले
जे जे सहन केले, त्याच्या कहाण्या,
लक्ष देऊन ऐका.





कारण, तुम्हीच नवे वसंत आहात
या विश्वरूपी जंगलाचे!

गर्डा विसमन क्लेन, या पुस्तकाच्या लेखिका, स्वत: नरसंहारातून वाचलेल्या, मागे उरलेल्यांपैकी, एक आहेत. त्यांच्या कुटुंबातील प्रत्येक सदस्य आणि बहुतेक सर्व मित्र छळ-छावण्यांमध्ये मारले गेले. युद्ध संपता संपता, गर्डाची साईलेशिया मधून सुटका झाली, जिथे इतर बंदींसोबत एका महिला श्रमिक कँप मधून तिलाही डेथ मार्च मध्ये सामील व्हावे लागले होते. त्या आज भरपूर प्रवास करतात आणि युनायटेड ज्युईश अपील (युजेए), बॉन्ड्स फॉर इजराईल, हदास्सा, महाविद्यालये, शाळा, आणि इतर सभा-संमेलनांमधून व्याख्यानं देतात. त्यांनी 'ऑल बट माय लाईफ' नावाचे पुस्तक लिहिले आहे, ज्यात त्यांच्या यातना आणि त्यांचे जिवंत मागे राहणे याचे वर्णन आहे. त्यांच्या अजून एका पुस्तकाचे नाव आहे 'ब्ल्यू रोज'. ही एका विशेष बालिकेची गोष्ट आहे, जी सर्वांपेक्षा वेगळी आहे. ती निळ्या गुलाबासारखी आहे, म्हणून तिला खूप काळजीपूर्वक सांभाळण्याची गरज आहे, न की टाकून देण्याची. मिसेस क्लेन 'द बफेलो न्यूज' मध्ये लहान मुलांसाठी साप्ताहिक स्तंभ लिहितात. त्यांना अनेक सन्मान प्राप्त झाले आहेत, त्यात 'वूमन ऑफ द इयर' पुरस्कार, ह्युमेन लेटर्सकडून दोन विद्यावाचस्पती पदव्या, आणि ह्युमॅनिटेरीअन साईटेशन फॉर द इयर ऑफ द स्पेशल चाईल्ड, यांचा समावेश आहे. त्यांना दोन मुली, एक मुलगा आणि चार नातवंडे आहेत. त्या आपल्या पतीसोबत बफेलो या उपनगरात राहतात.



नव्या वसंताचे आश्वासन

हे पुस्तक तुम्ही स्वत: वाचा, आणि तुम्ही एका भूतकाळ बनू पाहणाऱ्या युगासाठी दु:ख कराल - मानवाचा साधेपणा हरवण्याचे दु:ख कराल. तुमचे हृदय, ज्यांची हृदये आता बंद पडली आहेत, त्यांच्यासाठी शोक करेल.

लहान मुलालाही वाचू दे हे पुस्तक, त्यातून तुम्ही त्याची समज ज्याने वाढेल, असे एक प्रवेशद्वार उघडाल - नष्ट झालेल्या जगाचे स्मरण, विध्वंसातील क्रौर्य, आणि जे कुणी नवे निर्माण करू पहात आहेत त्यांचे धैर्य.

हे पुस्तक मुलांसोबत वाचाल तेव्हा तुम्ही त्यांना एक अनुभव द्याल - तुमच्या दोघांसाठी एक अनमोल क्षण असेल तो. त्या कवितांमध्ये आणि त्यातील संवेदनक्षमतेमध्ये अनेक अर्थ दडलेले सापडतील, नवी पीढी हीच तर नव्या वसंताचे आश्वासन आहे, अशी आशा देणारे अनादि आविष्कार यांमध्ये सापडतील.